आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
४ डिसेंबर २०२५ - गुरूवार

**ठळक बातम्या**

- देशभरात आज नौदल दिवस साजरा/ राष्ट्रपती, प्रधानमंत्र्यांकडून नौदलातल्या जवानांना शुभेच्छा

- तेविसाव्या भारत-रशिया वार्षिक शिखर परिषदेसाठी रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतीन आज भारताच्या दौऱ्यावर

- चालू आर्थिक वर्षात भारताच्या सकल राष्ट्रीय उत्पादन वाढीचा दर ७ पूर्णांक ४ दशांश टक्के राहण्याचा अंदाज फिच संस्थेकडून व्यक्त

**आणि**

- श्रीलंकेत दितवाह चक्रीवादळातल्या बळींची संख्या आता ४७९ वर

**<><><><><>**

आज देशात नौदल दिवस साजरा होत आहे. समुद्री सीमा सुरक्षित ठेवण्यापासून ते समुद्रातल्या आव्हानात्मक परिस्थितीत जीवित बचाव मोहिमा राबवण्यापर्यंत, भारतीय नौदल आपल्या सामर्थ्याचं आणि राष्ट्रीय अभिमानाचं प्रतीक म्हणून खंबीरपणे उभं आहे. **राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू** यांनी समाज माध्यमावर लिहिलेल्या संदेशात भारतीय नौदलाच्या कार्याची प्रशंसा केली. नौदलातील शिस्त, करुणा आणि जबाबदारी या गुणांचं राष्ट्रपतींनी कौतुक केलं. तसंच भारतीय नौदल राष्ट्राच्या सुरक्षेसह जागतिक पातळीवरही महत्त्वाची भूमिका बजावत असल्याचं त्यांनी आपल्या संदेशात नमूद केलं.

भारतीय नौदल देशाच्या सामुद्री शक्ती, सतर्कता आणि राष्ट्रीय हितांचं रक्षण करण्यासाठी वचनबद्ध असल्याचे मूर्तिमंत प्रतिक आहे, अशा भावना **उपराष्ट्रपती राधाकृष्णन** यांनी व्यक्त केल्या.

आयएनएस विक्रांत या युद्ध नौकेवरील तैनात असलेले जवान आणि अधिकाऱ्यांसोबत साजरी केलेली दिवाळी अत्यंत संस्मरणीय होती, असं **प्रधानमंत्री नरेंद्र मोदी** यांनी समाज माध्यमावरील संदेशात म्हटलं आहे.  देशाच्या सागरी सीमा सुरक्षित

ठेवण्यासाठी नौदलाने दाखवलेलं शौर्य, समर्पण आणि कर्तव्यनिष्ठेचंही प्रधानमंत्र्यांनी कौतुक केलं.

**होल्ड.. बाईट - प्रधानमंत्री**

**संरक्षण मंत्री राजनाथ सिंह** यांनीही नौदल दिनानिमित्त शुभेच्छा दिल्या. हिंद महासागरातील सर्वात मोठी नौदल शक्ती म्हणून भारतीय नौदल शौर्य, सजगता आणि आत्मनिर्भरतेच्या भावनेने देशाच्या सागरी हितांचे संरक्षण करत असल्याचं सिंह यांनी समाज माध्यमावरील संदेशात नमूद केलं आहे. **केंद्रीय गृहमंत्री अमित शहा** यांनीही नौदल दिनानिमित्त जवानांना आणि अधिकाऱ्यांना शुभेच्छा दिल्या आहेत.

मुंबईत नेव्हल डॉकयार्ड इथं नौदल दिनानिमित्त विशेष कार्यक्रम आयोजित केला होता. यावेळी पश्चिम विभागाचे नौदल कमांडचे चीफ ऑफ स्टाफ व्हाइस ॲडमिरल राहुल गोखले यांनी नेव्हल डॉकयार्ड इथल्या गौरव स्तंभावर पुष्पचक्र अर्पण करून शहीदांना आदरांजली वाहिली.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी २०१९ मध्ये सुरु केलेल्या जलजीवन मिशनच्या माध्यमातून आतापर्यंत १५ कोटी नागरिकांना नळाद्वारे पाणी पुरवठा सुरु करण्यात आला आहे. जलशक्ती मंत्री सी.आर.पाटील यांनी आज लोकसभेत शून्य प्रहरात विचारलेल्या पुरवणी प्रश्नाला उत्तर देतांना ही महिती दिली. चार कोटी नागरिकांना नळाद्वारे पेयजल पुरवण्याच्या योजनेचं काम सुरु असल्याचंही त्यांनी यावेळी सांगितलं. पाणी पुरवठ्यासंदर्भातल्या योजनांसाठी ३८ हजार कोटी रुपये मंजूर करण्यात आल्याचंही ते म्हणाले.

**<><><><><>**

सरकार विरोधी पक्षांनी उपस्थित केलेल्या मुद्द्यांवर चर्चा टाळत असल्याच्या विरोधकांच्या आरोपांचं राज्यसभेचे सभागृह नेते जगत प्रकाश नड्डा यांनी खंडन केलं आहे. राज्यसभेतले विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे यांच्या प्रश्नांना ते उत्तर देत होते. संसदेत उपस्थित केलेल्या प्रत्येक मुद्द्यावर सरकार चर्चा करायला तयार असून विरोधी पक्ष सदस्यांनी उपस्थित केलेल्या कोणत्याही मुद्द्यावरची चर्चा टाळलेली नसल्याचं नड्डा यांनी सांगितलं. गेल्या अधिवेशनातही सरकारने चर्चेसाठी वेळ दिला होता आणि त्यानुसार सभागृहात पूर्ण चर्चा झाली होती, असंही नड्डा म्हणाले.

<><><><><>

देशाचा इलेक्ट्रिक वाहन क्षेत्रातली उलाढाल २०३० पर्यंत २० लाख कोटी रुपयांपर्यंत पोहचेल, अशी माहिती केंद्रीय रस्ते आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी लोकसभेत एका पुरवणी प्रश्नाच्या उत्तरात दिली. येत्या ५ वर्षात ५ कोटींहून अधिक रोजगार निर्माण करण्याची क्षमता या उद्योगात असल्याचं त्यांनी सांगितलं. आसाममध्ये झालेल्या पावसामुळे महामार्गाचं नुकसान झालं असून त्याव्यतिरिक्त महामार्गांसंबंधीच्या तक्रारींनुसार कारवाई करण्यात आली आहे. तसंच, महामार्ग दुरुस्तीचं कामही युद्धपातळीवर सुरू असल्याचं केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी लोकसभेत एका प्रश्नाच्या उत्तरावेळी स्पष्ट केलं. आसाममध्ये टोलवसुली होत असली तरी रस्त्यांचा दर्जा निकृष्ट असल्याचा प्रश्न काँग्रेस खासदार गौरव गोगोई यांनी लोकसभेत उपस्थित केला होता.

केंद्र सरकारने धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष योजनेअंतर्गत देशभरातल्या आदिवासी गावांच्या विकासासाठी ८० हजार कोटी रुपये राखीव ठेवले आहेत, अशी माहिती आदिवासी व्यवहार मंत्री जुएल ओराम यांनी आज लोकसभेत प्रश्नोत्तराच्या तासात पुरवणी प्रश्नाच्या उत्तरात दिली. आरोग्य, शिक्षण तसंच वीजपुरवठ्यात सुधारणा करण्यासाठी ६३ हजारांहून जास्त गावांमधे पायाभूत सुविधांच्या विकासासाठी ही योजना कार्यान्वित करण्यात आली आहे, असं जुएल ओराम यावेळी म्हणाले.

<><><><><>

तेविसाव्या भारत-रशिया वार्षिक शिखर परिषदेसाठी रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन आज भारताच्या दौऱ्यावर येणार आहेत. या दोन दिवसांच्या दौऱ्यादरम्यान, पुतिन उद्या प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याशीचर्चा करतील. दोन्ही नेते परस्पर हिताच्या प्रादेशिक आणि जागतिक मुद्द्यांवर विचार विनिमय करतील. व्यापार, अर्थव्यवस्था, आरोग्यसेवा, शैक्षणिक, सांस्कृतिक संस्कृती आणि माध्यमांशी संबंधित अनेक करारांवर स्वाक्षऱ्या होण्याची अपेक्षा आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मूही पुतीन यांची भेट घेणार असून त्यांच्या सन्मानार्थ मेजवानीचे आयोजन करण्यात आलं आहे.

<><><><><>

अर्थव्यवस्थेसंदर्भातली जागतिक स्तरावरची मानांकन संस्था फिचनं चालू आर्थिक वर्षात भारताच्या सकल राष्ट्रीय उत्पादन वाढीचा दर ७ पूर्णांक ४ दशांश टक्के राहण्याचा

अंदाज व्यक्त केला असून तो पूर्वीच्या ६ पूर्णांक ९ दशांश टक्क्यांच्या अंदाजापेक्षा अधिक आहे. अलीकडेच केलेल्या कर सुधारणेमुळे ही वाढ होईल असंही फिचनं म्हटलं आहे. खाजगी ग्राहकांकडून करण्यात येणारा खर्च आणि वस्तू आणि सेवाकरातल्या सुधारणांमुळे हे शक्य होणार आहे. पुढच्या आर्थिक वर्षात जीडीपीचा दर ६ पूर्णांक ४ दशांश टक्के होणार असून डॉलरच्या तुलनेत रुपयाही प्रतिडॉलर ८७ रुपयांचा आसपास राहण्याचा अंदाजही फिचनं वर्तवला आहे.

**<><><><><>**

राज्यातल्या काही नगरपंचायती आणि नगरपरिषदांच्या निवडणुका आयत्या वेळी पुढे ढकलल्याबद्दल मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद पीठानं तीव्र ताशेरे ओढले आहेत. मात्र, न्यायालयानं आयोगाचा हा निर्णय कायम ठेवला आहे. निवडणुकीत पारदर्शकतेचं पालन करावं असे निर्देश न्यायालयाने दिले असून निवडणुकीचे निकाल टप्प्याटप्प्यानं घोषित करण्याच्या नागपूरच पीठाच्या आदेशांना स्थगिती दिली आहे.

**<><><><><>**

इंडिगो विमान कंपनीची विमान सेवा सलग तिसऱ्या दिवशी विस्कळीत झाल्यानं हजारो प्रवाशांचे हाल होत आहेत. देशातील एक मोठी विमानसेवा पुरवठादार असलेल्या इंडिगो विमानांची १८०हून अधिक उड्डाणं रद्द झाल्यानं दिल्ली, मुंबई, हैदराबाद या प्रमुख विमानतळांसह इतर शहरांमधील प्रवाशांना अडचणींचा सामना करावा लागत आहे.

**<><><><><>**

श्रीलंकेत नुकत्याच येऊन गेलेल्या दितवाह चक्रीवादळातल्या बळींची संख्या आता ४७९ झाली आहे. वादळामुळे घडलेल्या विविध दुर्घटनांमध्ये साडेतीनशे लोक अद्याप बेपत्ता आहेत. अद्यापही श्रीलंकेतल्या काही दुर्गम भागातून पूर, दरडी कोसळण्याच्या त्याचप्रमाणे भूस्खलन आणि इमारती कोसळण्याच्या बातम्या येत आहेत. श्रीलंकेतल्या अनेक भागातला संपर्क अद्याप तुटलेलाच असून काही भाग मदतीपासून वंचित आहेत. दरम्यान भारतानं ऑपरेशन सागर बंधूच्या माध्यमातून आवश्यक ती मदत सुरु ठेवली आहे. भारतीय वैद्यकीय पथक आणि तात्पुरत्या रुग्णालयांची उभारणी करणारी आवश्यक ती यंत्रसामुग्री काल कोलंबोत पोहोचली आहे. भारतीय सैन्यदल आणि एनडीआरएफचं पथक श्रीलंकेच्या या आपत्तीच्या वेळी मानवी दृष्टीकोनातून मदत पुरवत आहे.

आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
४ डिसेंबर २०२५ - गुरूवार

**<><><><><>**

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या प्रशासनानं अमेरिकेतल्या शिक्षणासाठी आणि काम करण्यासाठी आवश्यक असलेल्या एच वन बी व्हिसाची सुरक्षा तपासणी अधिक कठोर करण्याचा निर्णय घेतला आहे. यामध्ये अर्जदाराच्या वैयक्तिक माहितीबरोबरच त्याच्या समाज माध्यमांवरच्या प्रोफाईलचीही तपासणी केली जाणार आहे. यामध्ये चुकीची माहिती देणं, दिशाभूल करणं किंवा ऑनलाईन सुरक्षेला धोका पोहोचवणं यांसारख्या बाबींच्या कठोर तपासणीचा अंतर्भाव आहे. माहिती आणि तंत्रज्ञान क्षेत्रात काम करणाऱ्यांमध्ये एच वन बी व्हिसा धारकांची संख्या सर्वाधिक आहे.

**<><><><><>**

कतारची राजधानी दोहा इथं आजपासून ISSF आंतरराष्ट्रीय नेमबाजी विश्वचषकाच्या अंतिम स्पर्धेला सुरुवात होत आहे. या स्पर्धेत विश्वविजेता नेमबाज सम्राट राणा याच्या नेतृत्वाखाली १५ भारतीय नेमबाजांचा संघ सहभागी झाला आहे. या संघात मनु भाकर, सुरुची सिंह यांसारखे आघाडीचे नेमबाज आहेत.

यंदाच्या वर्षात भारतीय नेमबाजांनी उत्तम कामगिरी बजावली आहे. या वर्षी सम्राट राणा, ऐश्वर्य तोमर आणि एलावेनिल वलारिवन यांनी सर्वोत्तम कामगिरी बजावली आहे. ISSF आंतरराष्ट्रीय नेमबाजी विश्वचषक स्पर्धेच्या अंतीम फेरीत भारताचे ९ पिस्तूल नेमबाज, ५ रायफल नेमबाज आणि एक शॉटगन खेळाडू पात्र ठरले आहेत. त्यामुळे भारताला पदक मिळण्याची संधी आहे.

**//<><><><><>//**